# CURRENT GLOBAL REVIEWER

Impact Factor – 7.139 ISSN – 2319-86948
Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

# Relevance of Mahatma Gandhi in Today's World

**March 2020 Special Issue – 28, Vol. 2**

Chief Editor
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editors**
*Guide*
**Dr. B. G. Gaikwad**
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

**Dr Dr. Balasaheb S. Kshirsagar**
Director, Gandhian Studies Centre
Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*
**Dr. Dhale S.U.**
Dept. of Political Science,
Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*
**Dr. Hurgule N.R.**
Dept. of Sociology,
Shivaji College, Hingoli (MS)

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

**Shaurya Publication, Latur**

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) - 7.139 | Special Issue -28 , Vol. 2 | Jan. 2020 | Peer Reviewed

# Index

1. महात्मा गांधीजीचे स्त्री सशक्तीकरण विचार व कार्य — 1
डॉ. राम फुन्ने

2. महात्मा गांधीच्या सर्वोदय संकल्पनेची प्रासंगिकता — 3
प्रा. डॉ. सुखनंदन ढाले

3. महात्मा गांधी: आदर्श सर्वोदय समाज — 5
कल्याण दतात्रय यादव

4. हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामात महात्मा गांधी यांचे योगदान — 7
डॉ. बी. एस. क्षीरसागर , प्रा. अशोक अंभोरे

5. महात्मा गांधी यांच्या राजकीय विचारांची वर्तमान काळात असणारी गरज — 10
डॉ.आचार्य व्ही.डी

6. महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास. — 13
प्रा.रामेश्वर शंकरराव धप्पाधुळे

7. महात्मा गांधी यांचे साहित्य व विचार — 15
प्रा.दत्ता नामदेव कोटरंगे

8. महात्मा गांधी विचार आणि आजचा तरुण — 17
प्रा. डॉ. आर.बी. भाकरे

9. महात्मा गांधीचा ग्रामीण विकासाचा दृष्टीकोन — 20
प्रा.आर.एच. सगर, प्रा.डॉ. एस.एन. सातव

10. महात्मा गांधी आणि महिला सबलीकरण — 22
प्रा.सौ.स्वामी एस.एस.

11. सविनय कायदेभंग चळवळीत दारुबंदीतील पूर्व खान्देशचा सहभाग- एक दृष्टीक्षेप — 25
प्रा. डॉ. रमेश धनराज जाधव

12. महात्मा गांधी यांचा क्रौंचवध कादंबरीवरील प्रभाव — 29
डॉ.मुक्ता निवृत्ती बिरादार

13. "गांधी विचार व मराठी साहित्य" — 31
प्रा. डॉ. शरदचंद्र देगलूरकर

14. महात्मा गांधीजीचे ग्रामस्वराज्य विषयक विचार — 33
प्रा.के.जे . खंदारे

15. महात्मा गांधी आणि भारतीय जनमानस — 35
प्रा.डॉ. देविदास ग्यानुजी नरवाडे

16. महात्मा गांधीजींचा स्त्री सबलीकरणाचा दृष्टीकोन — 38

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI



64

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 2<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामात महात्मा गांधी यांचे योगदान

| डॉ. बी. एस. क्षीरसागर | प्रा. अशोक अंभोरे |
|---|---|
| संशोधक मार्गदर्शक | इतिहास विभाग प्रमुख |
| इतिहास विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली | तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव |

**सारांश :-**

महात्मा गांधी यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान फार मोठे आहे. यांच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य चळवळीने 1920 ते 1947 पर्यंत यशस्वीपणे लढा दिला. 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून मुक्ती झाली. भारत स्वतंत्र झाला. परंतु हैद्राबाद संस्थानामध्ये मात्र निजामाची सत्ता होती. निजाम सरकारच्या विरोधात संस्थानातील जनतेने लढा उभारला होता. या लढ्याला राष्ट्रीय कॉंग्रेसच्या नेत्यांचे मार्गदर्शन होते. महात्मा गांधी यांच्या मार्गदर्शनानुसार हैद्राबाद संस्थानामध्ये स्टेट कॉंग्रेसची स्थापना झाली होती. हैद्राबाद संस्थानामध्ये स्टेट कॉंग्रेसचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू हे करीत होते. यांच्या प्रयत्नाने इ.स. 1937 मध्ये कर्नाटक परिषद, आंध्र परिषद व महाराष्ट्र परिषदेचे एकीकरण झाले.[1] 29 जून 1938 रोजी हैद्राबाद शहरातील मवाळ नेत्यांनी हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसची स्थापना केली. परंतु या स्थापनेवर निजाम सरकारने बंदी घातली. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ यांचे नेतृत्व पुढे आले. त्यांनी महात्मा गांधी यांच्या मार्गदर्शन घेतले. त्यानंतरच्या काळात हैद्राबाद संस्थानामध्ये झालेले सत्याग्रह, वंदे मातरम चळवळ यांना महात्मा गांधीचा पाठींबा होता. हैद्राबाद संस्थानातील स्वातंत्र्याला हा भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा भाग आहे. हे महात्मा गांधी यांनी जाहीर करुन राष्ट्रीय कॉंग्रेसचे समर्थन हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाला जाहीर केले. यांचा फार मोठा परिणाम स्वातंत्र्य लढ्यावर झाल्याचे दिसते.

**बीजसंज्ञा :-**

स्वातंत्र्य, सत्याग्रह, कॉंग्रेस, सशस्त्र लढा, चळवळ.

**प्रस्तावना**

हैद्राबाद हे राज्य आणि त्यावर असलेली आसफिया घराण्याची सत्ता होती. आसफिया घराण्याचा उदय मुलुखगिरी, साहस, पराक्रम अथवा युध्द कौशल्य यातून झालेला नव्हता. तर निजामाच हैद्राबाद हे दगाबाजी व संधी साधूपणा यामधून निर्माण झालेले आहे. औरंगजेबाच्या मृत्यूंनतर निर्माण झालेल्या गांधळाचा व अराजकतेचा फायदा घेत चीनकिलीजखान मीर कमरुद्दीन असफजहा याने स्वातंत्र्य घोषित केले. त्यानंतर 1948 पर्यंत हैद्राबाद राज्यामध्ये सात सत्ताधिर सत्तेवर आले. एकूण दोनशे चोवीस वर्ष निजाम घराणे टिकले. हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनाच्या वेळी मीर उस्मान अलिखान बहादूर हा हैद्राबादचा निजाम होता. त्याने हैदवाद संस्थानातील स्वातंत्र्य चळवळीला नेस्तनावुत करण्याचे प्रयत्न केले. जनतेवर अन्याय, अत्याचार केले. दडपशाहीचा अवलंब केला. परिणामी याकडे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या महात्मा गांधी यांचे लक्ष वेधल्या गेले. पुढे त्यांच्या मार्गदर्शनानुसार व पाठिंब्याने हैद्राबाद स्वातंत्र्य लढा सुरु राहिला. आणि 17 सप्टेंबर 1948 रोजी भारत सरकारने केलेल्या पोलीस कारवाईत हैदवाद राज्याचे भारतामध्ये विलीनीकरण झाले. यामध्ये महात्मा गांधी यांचे योगदान महत्वाचे आहे. याचा थोडक्यात आढावा प्रस्तुत शोध निबंधामध्ये घेण्यात आला आहे.

**उद्देश :-**

प्रस्तुत शोध निबंधाचा उद्देश पुढीलप्रमाणे आहे.

1) हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्याविषयी जाणून घेणे.

2) हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्यामध्ये महात्मा गांधी यांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**गृहितके :-**

1) हैद्राबाद राज्यामधील जनतेने स्वातंत्र्य प्राप्तीसाठी लढा दिला आहे.

2) हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्याला महात्मा गांधी यांचे मार्गदर्शन व पाठिंबा होता.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंधलेखनासाठी सामाजिक शास्त्रातील वर्णनात्मक व ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे.

**महात्मा गांधी यांचे हैद्राबाद स्वातंत्र्यलढ्यातील योगदान :-**

महात्मा गांधी यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यामधील योगदान महत्वाचे आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली हैद्राबाद संस्थानामध्ये कर्नाटक परिषद, आंध्र महासभा व महाराष्ट्र परिषद या तीन स्वतंत्र संघटनाचे एकत्रीकरणातून 29 जून 1938 रोजी हैद्राबाद शहरामध्ये हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसची स्थापना केली. परंतु स्थापनेनंतर निजाम सरकारने स्टेट कॉंग्रेसवर बंदी घातली. यामुळे हैद्राबाद संस्थानातील मवाळ



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28 , Vol. 2
March 2020

Peer Reviewed
SJIF

ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

नेत्यांमध्ये भीती निर्माण झाली. आणि स्टेट कॉंग्रेसचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ यांचेकडे प्रयत्न केले. महात्मा गांधी यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार कार्य सुरु झाले. त्यांच्या या योगदानाचा अभ्यास पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**1) स्टेट कॉंग्रेसवरील बंदि उठवण्यासाठी प्रयत्न :-**

हैद्राबाद संस्थानामध्ये 29 जून 1938 मध्ये स्टेट कॉंग्रेसची स्थापना झाली. यानंतर निजामाने स्टेट कॉंग्रेसवर बंदि घातली. स्टेट कॉंग्रेसमधील मवाल नेते बाजूला गेले. व कॉंग्रेसचे नेतृत्व जहाल नेत्याकडे आले. त्यांनी महात्मा गांधी यांच्याशी चर्चा केली. त्यांचे मार्गदर्शन घेतले. निजामाने कॉंग्रेस शब्द वगळावा अशी सुचना केली होती. परंतू महात्मा गांधी यांची कॉंग्रेस शब्द वगळू नये अशी सुचना संस्थानातील नेत्यांना केली. यासाठी सत्याग्रह करावा लागला तरी चालेल अशी भूमिका त्यांनी घेतली.

**2) स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रहाला मार्गदर्शन :-**

यासाठी २४ ऑक्टोंबर 1938 रोजी संस्थानामध्ये अहिंसक मार्गाने सत्याग्रह सुरु केला.[2] हा सत्याग्रह 24 डिसेंबर 1938 पर्यंत चालू होता. या सत्याग्रहीत हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठवावी, जबाबदार राज्यपध्दती अंमलात आणावी. व जनतेला राजकीय स्वातंत्र्य दयावे ह्या मागण्या निजामासमोर ठेवल्या होत्या. या सत्यागहीमुळे निजाम सरकार अडचणीत आले होते. पुढे 24 डिसेंबर 1938 रोजी महात्मा गांधीच्या आदेशाने सत्याग्रह स्थगित झाला. महात्मा गांधीव्दारा सत्याग्रह स्थगित केला जाण्याचा निर्णय स्वामी रामानंद तीर्थ गोविंदराव नानल यांसारख्या नेत्यांना रुचला नाही.[4]

**3) वंदे मातरम सत्याग्रहींना मार्गदर्शन :-**

मराठवाडा व हैद्राबाद संस्थानातील स्टेट कॉंग्रेसचे नेते महात्मा गांधी यांच्या विचाराने प्रभावित होते. ते वारंवार महात्मा गांधी यांची भेट घेऊन संस्थानातील चळवळ व राजकारण याविषयी चर्चा करीत असत. हैद्राबाद राज्यात निजामाने वंदे मातरम हे गीत म्हणण्यास बंदी घातली होती. या विरोधात विदयार्थ्यांनी वंदे मातरम चळवळ सुरु केला. औरंगाबाद येथून वंदे मातरम चळवळ सुरु झाली. पुढे ती राज्यातील सर्व भागात पोहचली. गोविंदभाई श्रॉफ हे या चळवळीचे उदगाते होते. विदयार्थ्यांना शाळा, महाविदयालये व विदयापीठावर चळवळीस महात्मा गांधी यांनी पाठिंबा दिला होता.[5] त्यांनी निजाम सरकारला ठणकावून सांगितले की, वंदे मातरम गीत म्हणण्याचा विदयार्थ्यांना संपुर्ण अधिकार आहे.[6]

**4) वैयक्तिक सत्याग्रह :-**

महात्मा गांधी यांनी ब्रिटीश सरकारच्या विरोधात वैयक्तिक सत्याग्रह सुरु केला. यावेळी स्वामी रामनंद तीर्थ यांनी महात्मा गांधी यांची भेट घेतली. आणि हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसकडून वैयक्तिक सत्याग्रहात सहभाग नोंदविण्याची इच्छा व्यक्त केली. यावेळी महात्मा गांधी यांनी असे म्हटले की, "हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे अस्तित्व मान्य करवुन घेण्यासाठी वैयक्तिक सत्याग्रही शिवाय पर्याय दिसत नाही. मात्र यावेळचा सत्याग्रह वेगळा असेल. तुमच्यापैकी ज्याची इच्छा असेल. त्यांनी सत्याग्रहात भाग घ्यावा. यावेळी सामुदायिक चळवळ होणार नाही. जे जेलमध्ये जातील त्यांना दिर्घकाळ तेथे राहावे लागेल. मी मध्यस्थी करणार नाही. सुटकेसाठी लिहणार नाही"[7] यानंतर स्वामी रामानंद तीर्थ यांनी महात्मा गांधीचे म्हणणे मान्य केले. व महात्मा गांधींनी त्यांना वैयक्तिक सत्याग्रह करण्याची परवानगी दिली.

**5) हैद्राबाद संस्थानात चलेजाव आंदोलन :-**

दुसरे महायुध्द 1 सप्टेंबर 1939 रोजी सुरु झाले. या महायुध्दात ब्रिटन अडचणीत आहे. हे लक्षात घेऊन कॉंग्रेसने चलेजाव आंदोलन सुरु केले. 1942 च्या मुंबई येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनात चले जावचा ठराव पास झाला. याचबरोबर संस्थानांही या चळवळीत सामावून घेण्याचे ठरले. त्यानुसार महात्मा गांधी यांनी हैद्राबाद संस्थानात सरकारच्या विरोधात आंदोलन करण्याचा आदेश दिला. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम हा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचा भाग आहे. हे महात्मा गांधी यांनी 1942 मध्ये जाहिर केले.[8]

3 जुलै 1946 रोजी निजाम सरकारने हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठवली. 15 ऑगस्ट 1947 ला देश स्वतंत्र झाला. हैद्राबादच्या निजाम मीर उस्मान अली यांनी आपले स्वतंत्र राज्य राहणार असल्याचे जाहीर केले. तसेच राज्यात भारतीय तिरंगा ध्वज फडकावण्यास कायदयाने गुन्हा ठरविण्यात आला. त्यामुळे महात्मा गांधी यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनानुसार 7 ऑगस्ट 1947 रोजी हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने झेंडा सत्याग्रह सुरु केला.[9] हा सत्याग्रह 12 सप्टेंबर 1948 पर्यंत सुरु होता. जंगल सत्याग्रह, सिंदीची झाडांची तोड सत्याग्रह 16 सप्टेंबर 1948 पर्यंत सुरु होते. परंतू हैद्राबाद संस्थानातील सशस्त्र लढयास महात्मा गांधींनी पाठींबा दिला नाही.

**निष्कर्ष :-**

1) हैद्राबाद संस्थानामधील चळवळ सरंजामशाही प्रवृत्तीच्या शासकाच्या विरोधात होती.
2) हैद्राबाद राज्यातील सरकार धार्मिक आधारावर चालविले जात होते.
3) निजाम सरकारच्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात राज्यातील जनतेने प्रखर लढा दिला.
4) हैद्राबाद संस्थानातील जनतेच्या लढयास महात्मा गांधी यांनी पाठिंबा दिला होता.
5) महात्मा गांधी यांच्या मार्गदर्शनापनुसार स्टेट कॉंग्रेसची स्थापना झाली होती.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

6) महात्मा गांधींनी वंदे मातरम चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, झेंडा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, वैयक्तिक सत्याग्रह यांना पाठींबा दिला होता.

**मुल्यमापन :-**

महात्मा गांधी यांच्या विचारात अहिंसेला महत्व आहे. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळ अहिंसक मार्गाने चालविली. व देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. परंतू हैद्राबाद संस्थानातील परिस्थिती ब्रिटीश प्रांतापेक्षा वेगळी होती. ब्रिटीशाची कायदयावर व लोकशाही व्यवस्थेवर श्रध्दा होती. तशी हैद्राबाद संस्थानातील निजामाची नव्हती. येथे अरब, रोहिल, रझाकार, पोलिस जनतेवर अन्याय अत्याचार करित होते. ते अहिंसक मार्गाने लढा देणाऱ्या स्टेट काँग्रेस पुढे नमलेले नव्हते. त्यामुळे हैद्राबाद राज्यात निजामाच्या विरोधात सशस्त्र लढा सुरु करण्या संदर्भात स्वामी रामानंद तीर्थ यांनी महात्मा गांधी यांच्याशी चर्चा करुन मार्गदर्शन घेतले. गांधी यांनी सशस्त्र लढयास पाठींवा दिला नाही.

**संदर्भ सूची :-**

1) Desai U.H. (Editor), (1996), The Visionary important Speeches and writing of Swami Ramanand teerth, S.R.T.M.U. Nanded.
2) देऊळगांव, रवि पा. (संपादकीय), स्वामी रामानंद तीर्थ यांची दैनंदिनी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती, मुंबई, 22.
3) भालेराव अनंत, (2001), हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मुंबई, मौज प्रकाशन, व्दितीय आवृत्ती, 109.
4) लोखंडे चंद्रशेखर, मराठवाडा मुक्ती लढा आणि हैद्राबाद संस्थान, लातूर विदयाभारती प्रकाशन, 183.
5) भालेराव अनंत, (2001), हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मुंबई, मौज प्रकाशन, व्दितीय आवृत्ती, 109.
6) Hydrabad State Archives, Hydrabad, Constitutional affairs, Secretatiat file No. 1246.
7) देऊळगांव, रवि पा. (संपादकीय), स्वामी रामानंद तीर्थ यांची दैनंदिनी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती, मुंबई, 115
8) Dhengale B.S., (1998), Hyderabad freedom Struggle, Nanded, Kalpana Prakashan, 143.
9) भालेराव अनंत, (2001), हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मुंबई, मौज प्रकाशन, व्दितीय आवृत्ती, 289.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI